# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/08/2023 (बुधवार) दुपार

---

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा खंडाळा मरीयंबी येथे दिनांक २८/०८/२०२३ चे १२.३० वा. दरम्यान यातील मृतक नामे– सौ. अर्चना हर्षवर्धन पाटील, २३ वर्ष, रा. खंडाळा मरीयंबी ता. पारशिवनी ही विवाहीत असून तिचे लग्नास एक वर्ष ०४ महिने झाले असून यातील आरोपी नामे– ०१) हर्षवर्धन कमलकिशोर पाटील, वय २४ वर्षे ०२) कमलकिशोर पाटील ०३) ०२ महिला आरोपी सर्व रा. मौजा खंडाळा मरीयंबी ता. पारशिवनी यांनी संगणमत करून मृतक हिला तुझे आई वडीलांनी लग्नामध्ये सोन्याचे दागिने, फ्रिज टिव्ही सोफा भेट वस्तु दिल्या नाही तु आपले माहेरून सोन्याचे दागिने व इतर भेट वस्तु घेवून ये नाहीतर माझे घरी राहायचे नाही. अशी हुंडयाची मागणी करून शारीरीक व मानसिक त्रास दिल्यामुळे मृतक हिने सासरचे त्रासाला कंटाळुन स्वत:चे राहते घरी कोणतेतरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करून मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रामकिशोर चुनकावन कुरील, वय ५३ वर्षे, रा. सिल्लेवाडा खदान वार्ड क्र. ०२ दुर्गामाता मंदिर जवळ ता. सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ) ३०४ (ब). ३४ भादवि सहकलम ३, ४ हुंडा प्रतीबंध कायदा १९६१ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सोनवने पोलीस स्टेशन पारशिवनी मो. नं. ७०२०५७७४५९ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील कोहळी येथे दिनांक ०१/०४/२०२३ चे १३/०० वा. ते १३/३५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– नारायणसिग छत्तरसिंग चितोडिया, वय ७० वर्ष, रा. रेल्वे चादुर जि. अमरावती व आरोपी नामे– १) भवरसिग छत्तरसिग चितोडिया २) महिला आरोपी ३) उमाशंकर भवरसिंग चितोडिया तिन्ही रा. कोहळी हे सख्खे नातेवाईक असुन घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने आरोपींना घर विकल्याची पैशाची मागणी केली असता यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीला आरोपी क्र. ०१ ने लाकडी काठीने डोक्यावर मारून गंभीर जखमी केले व कानाच्यावर जोरजोराने मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. ४६७ मिश्रा मो. नं. ९९२३६९४४६७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर